# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 27/04/2020 (सोमवार)
(दुपार)

**शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपी विरूध गुन्हा नोंद**

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 25 कि.मी अंतरावर मौजा खुर्सापार चेकपोस्ट येथे दिनांक 26/04/2020 चे 19/45 ते 20/00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– परी. पोउपनि शिवाजी विक्रम मुंडे, पो स्टे कळमेश्वर हे मौजा खुर्सापार चेकपोस्ट येथे कोरोणा विषाणु प्रतिबंध निमित्ताने वाहन तपासनीचे शासकीय कर्तव्य करित असतांना यातील आरोपी नामे– 1) धनराज रमाजी फुसे, वय 56 वर्ष, रा. बेलतरोडी, नागपुर 2) सुरज मनोहर कुमरे, वय 48 वर्ष, रा. शामनगर, नागपुर 3) अशिष कन्हैयालाल धुर्वे, वय 22 वर्ष, रा. बजाज नगर, नागपुर यांनी संगनमत करुन त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन नाकाबंदीचे ठिकाणी वाहन न थांबवता समोर जावुन गाडी थांबवीले. यानंतर आरोपीतांनी फिर्यादिस सार्वजनिक ठिकाणी अश्लिल शिवीगाळ करुन धमकी दिली. तसेच आरोपीतांनी फिर्यादिचे अंगावर येउन हातबुक्कीने मारहाण करुन फिर्यादिचे छातीला, डाव्या खांदयाला व डाव्या दंडाला किरकोळ जखमी केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादिचे डाव्या बाजुच्या शर्टाची शोल्डर पट्टी पकडुन ओढतान केल्याने शोल्डर पट्टीतील स्टार तसेच विसल गार्ड हे तुटुन खाली पाडुन नुकसान केले व शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीतांविरुध्द कलम 353,332,427,186,294,504,506,34 भादवी सहकलम 85 मदाका 179, 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राठोड 8605585606 हे करीत आहे.

**चोरी**

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर मौजा आमडी शिवार येथे दिनांक 19/04/2020 चे 19.00 वा. ते दिनांक 20/04/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामा देवचंद कुंभलकर, वय 35 वर्ष, रा. साठक यांच्या ड्रायव्हरनी एमएच–40/एल–2071 क्रमांकाचा ट्रॅक्टर पाटी सह शेतातील काम संपल्यावर शेतातच ट्रॅक्टर उभा ठेवला होता. दरम्यान अज्ञात आरोपीने कि. 5,00,000/–रू. चा ट्रॅक्टर चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये

गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रावते 9420409454 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर